



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक २१, शनिवार ७ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# चैत्यभूमीवर भीमसागर लोटला!

## महामानवाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी मुंबापुरीत



**मुंबई : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून त्यांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांचा जनसागर मुंबईतील चैत्यभूमीवर शुक्रवारी लोटला होता.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी दरवषप्रमाणे यंदाही आंबेडकरी अनुयायी चैत्यभूमीवर दाखल झाले होते. ५ डिसेंबर रोजीच देशातील उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यातील अनुयायांसह महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अनुयायी दादार परिसरात दाखल झाले होते.

आंबेडकरी अनुयायांसाठी मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने निवारा मंडपांची व्यवस्था करण्यात आली होती. महापालिकेच्या आरोग्य कक्षात आणि जे जे रूग्णालयाच्या वतीने उभारलेल्या आरोग्य सेवा कक्षामध्ये हजारो अनुयायांनी नोंदणी करीत किरकोळ उपचार घेतले. मुंबईत दाखल झाल्यानंतर चैत्यभूमीवर जाउन बाबासाहेबांच्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी गुरूवारीच एक किलोमिटरहून अधिक लांबीची रांग लागली होती. प्रवासाने थकलो असलो तरी अभिवादनाची ओढ असल्याने आम्ही रांगेत उभे असल्याचे रांगेतील तरूणांनी सांगितले.

चैत्यभूमीवर येणाऱ्या लाखो आंबेडकरी अनुयायांसाठी शासन, पालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासनाने उत्तम नियोजन केले होते. अनुयायांसाठी महापालिका आणि अनेक समाजसेवी संस्थांनी भोजनाचीही व्यवस्था केली होती. समता सैनिक दलाचे स्वयंसेवक अहोरात्र अनुयायांना मार्गदर्शन आणि मदत करत असल्याने कुठेही गोंधळ अथवा गैरव्यवस्था आढळून आली नसल्याचे सांगत अनुयायांकडून चैत्यभूमीवरील व्यवस्थेचे कौतुक करण्यात येत होते.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी शुक्रवारी सकाळी चैत्यभूमीवर जाऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# भाजपात मंत्रिपदांसाठी भलीमोठी यादी!

## बलिदानासाठी कोण तयार होणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची, तर एकनाथ शिंदे, अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर आता मंत्रिमंडळात कोणाकोणाला संधी मिळणार याची उत्सुकता आहे. भाजपचे १३२ आमदार असल्यानं मंत्रिमंडळात त्यांच्या आमदारांची संख्या सर्वाधिक असेल. शिंदे सरकारमध्ये भाजपचे केवळ १० मंत्री होते. तर पक्षाच्या आमदारांची संख्या १०५ इतकी होती. त्यामुळे अनेकांना मंत्रिपदाची लॉटरी लागलीच नाही. ही सगळी आमदार मंडळी आता मंत्रिपदासाठी इच्छुक आहेत. त्यांची यादी तशी बरीच मोठी आहे.**

मंत्रिपदांसाठी इच्छुकांची भलीमोठी यादी आहे. तितकीच उत्सुकता विधानसभा अध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष पदावर कोणाची वर्णी लागणार याबद्दल आहे. पक्षाची सत्ता आल्यावर सगळ्यांना सरकारमध्ये जाण्यात रस असतो. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष होण्याची, विधानसभा अध्यक्षपदी बसण्याची कोणाचीही इच्छा नसते. आता भाजपनं जवळपास बहुमताचा आकडा गाठण्याइतके यश मिळवलेलं असताना प्रदेशाध्यक्ष आणि विधानसभा अध्यक्ष कोण होणार, याची उत्सुकता आहे.

पक्षाची सत्ता आल्यावर सगळ्यांना मंत्री होण्याची इच्छा असते. त्यामुळे


उर्वरीत पान ३ वर








# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

## ठिबक सिंचनामुळे रब्बी ज्वारीत उत्पादनवाढ

**महाराष्ट्रामध्ये रब्बी ज्वारीची लागवड ३४ ते ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर केली जाते. त्यापासून २४.९ लाख टन उत्पादन मिळत असले तरी सरासरी उत्पादकता कमी (म्हणजे हेक्टरी ६ ते ७ क्विंटल) आहे. रब्बी ज्वारीस त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे खरीप ज्वारीपेक्षा जास्त दर मिळतो. कारण रब्बी ज्वारीच्या दाण्याची व कडब्याची उत्तम प्रत हे होय. भविष्यातील अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ज्वारी पिकासारख्या कमी पाण्यामध्ये येणाऱ्या पिकाचे महत्त्व अधिकच वाढणार आहे. त्यातही काटेकोर पाणी वापराच्या दृष्टीने ठिबक सिंचनावर ज्वारी पीक घेण्याचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते.**

### रब्बी ज्वारीसाठी पाणी व्यवस्थापन

कमी पर्जन्यमान असणाऱ्या भागात ओलावा संवर्धन व पाण्याचा काटकसरीने वापर आवश्यक असतो. सद्यःस्थितीमध्ये पावसाचा अनियमितपणा वाढला आहे. भूजल पातळीही कमी झाली आहे. पिकाच्या संवेदनशील अवस्थेत पाणी उपलब्ध न झाल्यास उत्पादन कमी येते. त्यामुळे शक्य असल्यास संरक्षित पाण्याचा वापर उपयोगी ठरतो. या वेळी जमिनीत ओलावा नसल्यास किंवा पाऊस न आल्यास प्रवाही सिंचनाद्वारे पेरणीनंतर एक व इतर २ ते ३ सिंचन पाळ्या द्याव्यात. मात्र पाणी कमी असताना प्रवाही सिंचन शक्य होत नाही. कारण त्यात पाण्याचा भरपूर वापर होऊनही जमिनीत कायम वाफसा राहत नाही. पर्यायाने ज्वारीकडून अन्नद्रव्यांचे योग्य शोषण होत नाही. सिंचन पाण्याच्या काटेकोर वापराच्या दृष्टीने परभणी विद्यापीठातील पाणी व्यवस्थापन योजना, हैदराबाद (आंध्र प्रदेश) येथील ज्वारी संशोधन संचालनालय आणि भुवनेश्वर (ओडिशा) येथील पाणी व्यवस्थापन संचालनालय या संस्था गेल्या तीन वर्षांपासून अभ्यास आणि संशोधन करत आहेत. ठिबक सिंचन संचाचा वापर करण्यासाठी रब्बी ज्वारीच्या लागवड पद्धतीत थोडासा बदल करावा लागतो. आपल्याकडे असलेला ठिबक संच आणि भाजीपाला पिकासाठीच्या लॅटरल वापरता येतात. मध्यम ते हलक्या जमिनीसाठी दोन ओळींतील अंतर ४५ सेंमी व दोन झाडांतील अंतर १५ सेंमी इतके ठेवावे. मध्ये ७५ सेंमीचा मोकळा पट्टा ठेवावा. एका जोडओळीसाठी एक ठिबक नळी वापरावी. भारी जमिनीसाठी दोन ओळीतील अंतर ६० सेंमी व दोन झाडांतील अंतर १२ सेंमी इतके असावे. यामुळे प्रति हेक्टर ज्वारीच्या झाडांची संख्या राखता येईल. उगवणीनंतर कोळपणीच्या साह्याने प्रत्येक ओळीस माती लावून वरंबा तयार करावा.

### लॅटरलची निवड

ज्वारीसाठी शेताच्या किंवा पिकाच्या ओळीच्या लांबीनुसार १२ किंवा १६ मिमी व्यासाच्या इनलाइन नळ्या वापराव्यात. यामध्ये साधारण ३० ते ४० सेंमी अंतरावरील व २.४ लिटर प्रति तास प्रवाह असलेल्या ड्रीपर (तोट्या) अशी इनलाइन लॅटरल निवडावी. उपलब्ध लॅटरलमधील ड्रीपरचा प्रवाह जास्त असल्यास भारी जमिनीसाठी त्यातील अंतर ४० ते ५० सेंमीपर्यंत असलेली इनलाइन लॅटरल निवडता येईल. रब्बी ज्वारीसाठी ठिबक सिंचनाद्वारे लागणाऱ्या पाण्याची गरज ही झाडाची वाढीची अवस्था, बाष्पीभवनाचा वेग, पात्र गुणांक, पिकांचा गुणांक, जमिनीचा प्रकार, ओलाव्याचे क्षेत्र यावर अवलंबून असते. रब्बी हंगामात बाष्पीभवनाचा वेग साधारणपणे कमी असल्यामुळे (२ ते ५ मिलि प्रति दिवस) हे लक्षात घ्यावे. त्यानुसार आणि विजेची उपलब्धता याचा विचार करून संच दर दोन किंवा तीन दिवसांनी चालवावा.



## सूर्यफूल लागवड हवी वेळेवर!

**सूर्यफूल हे वर्षभर घेतले जाणारे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. हे पीक सूर्यप्रकाश व तापमानास संवेदनशील नसते. त्यामुळे खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तीनही हंगामात लागवड करता येते. हलक्या ते भारी अशा सर्व प्रकारच्या जमिनीत पीक उत्तम येते.**

सूर्यफुलाची मुळे जमिनीत खोलवर जात असल्यामुळे पाण्याचा ताण सहन करू शकते. त्यामुळे दुष्काळी भागातही चांगले उत्पादन मिळते. साधारण ८५ ते ९० दिवसांत पीक तयार होते. त्यामुळे कमी कालावधीत चांगले उत्पादन मिळून जाते. सूर्यफुलामध्ये तेलाचे प्रमाण ५ ते ४० टक्के इतके असते. थोड्या क्षेत्रात कमी कालावधीत या पिकापासून जास्त तेल उत्पादन मिळू शकते. सूर्यफूल तेलास चांगला बाजारभाव असल्यामुळे इतर तेलवर्गीय पिकांच्या तुलनेत किफायतशीर कमी खर्चात येणारे पीक म्हणून सूर्यफूल ओळखले जाते. आरोग्यासाठी देखील सूर्यफूल तेल चांगले मानले जाते.

### असे हवे हवामान

पिकाच्या वाढीसाठी २० ते २९ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. फुलोऱ्याच्या अवस्थेत ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान, सतत रिमझिम किंवा मोठा पाऊस, तसेच पीक धुक्यात सापडल्यास दाणे भरण्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे फुलोऱ्याची अवस्था पावसात व धुक्यात सापडणार नाही, याची काळजी घेऊनच पेरणीची वेळ ठरवावी.

### जमीन कशी हवी

किफायतशीर उत्पादनासाठी मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. थोड्याफार चोपण जमिनीत देखील हे पीक येते. जमिनीचा सामू ६.५ ते ८.५ पर्यंत असावा.

### पूर्वमशागत करताना

जमिनीची खोल नांगरणी करून कुळवाच्या ३ ते ४ पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणीपूर्वी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी ५ ते ६ टन प्रमाणे द्यावे.

### बियाणे निवडताना...

पेरणीसाठी सुधारित वाणाचे ७ ते ८ किलो आणि संकरित वाणाचे ५ ते ६ किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे. सूर्यफुलाचे सुधारित किंवा संकरित वाणाचे प्रमाणित बियाणे निवडावे.

- पेरणी : सूर्यफूल हे पीक सूर्यप्रकाश व तापमानास संवेदनशील नसले तरी अधिक उत्पादन मिळण्यासाठी योग्य वेळी पेरणी करणे महत्त्वाचे आहे. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. म्हणजे बी आणि खत एकाच वेळी पेरता येते. पेरणी करताना दोन ओळींतील अंतर मध्यम ते खोल जमिनीसाठी ४५ सेंमी तर भारी जमिनीसाठी ६० सेंमी इतके ठेवावे. दोन झाडांतील अंतर ३० सेंमी राहील अशा रीतीने पेरणी करावी.
- सिंचन व्यवस्थापन : पीकवाढीच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित पाणी द्यावे. रोप, फुलकळी, फुलोरा आणि दाणे भरण्याची अवस्था या सूर्यफूल पिकाच्या संवेदनशील अवस्था आहेत. या काळात पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी. फुलोरा आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत पिकास पाण्याचा ताण पडल्यास, दाणे भरण्यावर परिणाम होऊन उत्पादन घटते.
- पूरक परागीकरण : सूर्यफूल हे पीक परपरागसिंचित आहे. त्यामुळे दाणे भरण्यासाठी कृत्रिम परागीकरण घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी तळहाताला तलम कापड गुंडाळून हलका हात फिरवावा. साधारण एक दिवसाआड सकाळी ७ ते ११ या वेळेत ३ ते ४ वेळा फुलांवरून हलका हात फिरवावा किंवा परागीभवनासाठी मधमाश्यांच्या पेट्या हेक्टरी ४ ते ५ प्रमाणे ठेवाव्यात.

### खत व्यवस्थापन

कोरडवाहू पिकास नत्र ५० किलो (युरिया १०८ किलो), स्फुरद २५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट १५६ किलो) आणि पालाश २५ किलो (म्युरेट ऑफ पोटॅश ४२ किलो) प्रति हेक्टर प्रमाणे द्यावे. सर्व खते पेरणीच्या वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावीत. बागायती लागवडीस नत्र ६० किलो (युरिया १२९ किलो), स्फुरद ३० किलो (सिंगल सुपर फॉस्फेट १८८ किलो)आणि पालाश ३० किलो (म्युरेट ऑफ पोटॅश ५० किलो) प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. नत्राची मात्रा दोन समान हप्त्यांत विभागून द्यावी. नत्राची ३० किलो मात्रा पेरणीवेळी आणि उर्वरित ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.

### आंतरपीक पद्धती

खरीप हंगामात दोन ओळी सूर्यफूल अधिक एक ओळ तूर (२:१) ही आंतरपीक पद्धत फायदेशीर आहे. आंतरपीक पद्धतीमध्ये वेगवेगळ्या कालावधीत तयार होणाऱ्या दोन पिकांची लागवड केली जाते. जेणेकरून नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणामुळे एका पिकाचे नुकसान झाले, तरी दुसऱ्या पिकापासून उत्पादन हाती येते. त्यासाठी सलग लागवडीपेक्षा आंतरपीक पद्धती फायदेशीर ठरते.

### विरळणी, आंतरमशागत

पेरणीनंतर १५ ते २० दिवसांच्या आत विरळणी करून पीक तणविरहित ठेवावे. विरळणी करताना ३० सेंमी अंतरावर एक जोमदार रोप ठेऊन विरळणी करावी. आवश्यकतेनुसार खुरपणी करावी. पेरणीनंतर तिसऱ्या आठवड्यात पहिली कोळपणी आणि पाचव्या आठवड्यात दुसरी कोळपणी करावी. कोळपणीमुळे जमिनीवर मातीचे आच्छादन तयार होते. तसेच जमिनीवरील भेगावाटे ओलाव्याचे होणारे बाष्पीभवन रोखले जाऊन पिकाच्या वाढीसाठी फायदा होतो.

### बीजप्रक्रिया (प्रमाण-प्रतिकिलो बियाणे)

- बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम.
- केवडा रोग टाळण्यासाठी अ‍ॅप्रॉन (सक्रिय घटक मॅफेनोक्झाम) (३५ एसडी) ६ ग्रॅम.
- विषाणूजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड (७० डब्ल्यूएस) ५ ग्रॅम.
- त्यानंतर अ‍ॅझोटोबॅक्टर आणि पी.एस.बी. प्रत्येकी २५ ग्रॅम.

### वाण निवड

**सुधारित वाण**

| वाण | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्विं/हे.) | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| भानू | ८० ते ८५ | १२ ते १४ | सर्व हंगामात पेरणीस योग्य, अवर्षणप्रवण भागासाठी योग्य. |
| फुले भास्कर | ८२ ते ८७ | १४ ते १५ | पानांवरील ठिपके रोगास सहनशील, अवर्षणप्रवण भागासाठी योग्य. अधिक तेलाचे प्रमाण ३६ टक्के. |
| एल.एस.एफ. ८ | ९० ते ९५ | १० ते १४ | पानांवरील ठिपके रोगास सहनशील |
| टी.ए.एस-८२ | ९० ते ९५ | १० ते १२ | तेलाचे प्रमाण अधिक, महाराष्ट्रात लागवडीस योग्य. |
| डी.आर.एस.एफ.१०८ | ९० ते ९२ | १४ ते १६ | अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण ३६ टक्के. |
| डी.आर.एस.एफ.११३ | ९० ते ९५ | १४ ते १६ | अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण ३७ टक्के |


**संकरित वाण**

| | | | |
|---|---|---|---|
| एल.एस.एफ.एच.-३५ (मारुती) | ९० ते ९५ | १६ ते १९ (बागायती) | अधिक उत्पादन, महाराष्ट्रात लागवडीस योग्य, केवडा रोगास प्रतिकारक. |
| एस.सी.एच.-३५ | ९० ते ९५ | १२ ते १६ | महाराष्ट्रात लागवडीस योग्य, केवडा रोगास प्रतिकारक, तेलाचे प्रमाण अधिक. |
| डी.आर.एस.एच-१ | ९२ ते ९८ | १३ ते १६ | अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण ४० टक्के |
| फुले रविराज | ८५ ते ९० | १५ ते १९ | पश्चिम महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवडीसाठी |
| एल.एस. एफ.एच.-१७१ | ९० ते ९५ | १८ ते २२ | अधिक उत्पादन, केवडा रोगास प्रतिकारक. |
| पी.डी.के.व्ही. एस.एच.९५२ | ९० ते ९५ | १८ ते २० | मध्यम कालावधी, विदर्भात लागवडीसाठी योग्य. |

## गहू पिकातील तण नियंत्रणाचे उपाय

**गहू हे रब्बी हंगामातील एक महत्त्वाचे पीक आहे. राज्यात गव्हाची साधारणपणे १ ते १.२५ लक्ष हेक्टर क्षेत्रावर लागवड केली जाते. या पिकाची हेक्टरी उत्पादकता १९ ते २० क्विंटलपर्यंत आहे. गहू पिकात येणाऱ्या रुंद पानांच्या चांदवेल, रान मोहरी, रानमेथी, बथुवा, कृष्णनील, रान मटर, काटेमाठ इत्यादी तसेच गवतवर्गीय तणांमुळे पिकाचे सुमारे ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत नुकसान होते.**

गव्हाच्या अधिक उत्पादनक्षम, कमी उंच वाढणाऱ्या वाणांमध्ये रुंद पानी तणांच्या समस्या तीव्र झाली आहे. या तणांचे नियंत्रण पारंपरिक पद्धतींद्वारे करणे शक्य होत नाही. या तणांमुळे गहू पिकाच्या उत्पादनावर तसेच गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. त्यासाठी योग्य तणनाशकाची निवड अत्यंत आवश्यक आहे. तण नियंत्रणासाठी योग्य वेळी योग्य तणनाशकाचा वापर केल्यास संभाव्य नुकसान टाळता येते. गहू पिकात येणाऱ्या तणांच्या बंदोबस्तासाठी शेतकरी परंपरागत (२,४-डी) तणनाशकावर अवलंबून होते. परंतु या तणनाशकाच्या वापरामुळे गहू लागवडीशेजारील मोहरी किंवा हरभरा या रुंदपान असलेल्या पिकांचे नुकसान संभवते. त्यासाठी अनेक पर्याय सध्या बाजारात उपलब्ध आहेत. त्यामुळे गव्हात येणाऱ्या तणांचे प्रभावी नियंत्रण मिळण्यास मदत होते.





### रासायनिक तणनाशक अंश व्यवस्थापन

तणनाशकांच्या अति वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडते. वारंवार तणनाशक वापरामुळे भविष्यात तणनाशक अंश वाढीचा धोका लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. जमिनीमध्ये तणनाशकांच्या अंशाचे प्रमाण वाढू नये यासाठी काही उपाययोजना कराव्यात. शिफारशीत मात्रेमध्येच तणनाशकाचा वापर करावा. एकाच तणनाशकाचा सतत वापर टाळावा. एकच पीक सतत घेऊ नये. पिकांची फेरपालट करावी. सेंद्रिय खतांचा वापर केल्यास जमिनीतील तणनाशकांचे अंश धरून ठेवले जातात. तसेच सेंद्रिय खतांमुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांचे प्रमाण सुद्धा वाढते. त्याचाच परिणाम तणनाशकाचे विघटन होण्यास होते. जमिनीची खोल नांगरट करावी.

### एकात्मिक तणनियंत्रण

जमिनीची योग्य मशागत, प्रमाणित बियाण्याचा वापर, वेळेवर पेरणी, पूर्ण कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खताचा वापर, रासायनिक खतांचा समतोल व योग्य पद्धतीने वापर, योग्य पाणी व्यवस्थापन, वेळेत पीक संरक्षण व रासायनिक तणनाशकांचा आवश्यकतेनुसार वापर या बाबींचा अवलंब करून गहू उत्पादनात वाढ मिळविणे शक्य होते. गहू पिकात तण व्यवस्थापन करण्यासाठी उत्पादन खर्चात होणारी अतिरिक्त वाढ टाळण्यासाठी एकात्मिक तण व्यवस्थापन पद्धती फायदेशीर ठरते. एकात्मिक तण व्यवस्थापनामध्ये विविध तण नियंत्रण पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यामुळे तणांचे प्रभावी नियंत्रण करणे शक्य होते.

| तणनाशक प्रमाण (प्रति एकर) | वापराची वेळ | वापराची पद्धती |
|---|---|---|
| पेन्डीमेथॅलिन (३० टक्के ई.सी.) १ ते १.३३ लिटर | उगवणपूर्व पेरणीनंतर २४ ते ४८ तासांत जमिनीत पुरेसा ओलावा असताना. | तणनाशक फवारणीनंतर १० ते १२ दिवस पिकास पाणी देऊ नये. |
| २,४-डी सोडिअम सॉल्ट (८० टक्के डब्ल्यू.पी.) २५० ते ४०० ग्रॅम | उगवणपश्चात पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी. | रुंद पानांच्या बथुवा, पिवळा धोतरा, कृष्णनील, काटेमाठ, तांबा, रानमेथी इत्यादी तणांच्या व्यवस्थापनासाठी. |
| २,४-डी अमाइन सॉल्ट (५८ टक्के एस.एल) ३४५ ग्रॅम | उगवणपश्चात पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी. | रुंद पानांच्या तण व्यवस्थापनासाठी. |
| मेटसल्फुरॉन मिथिल (२० टक्के डब्ल्यू.जी.) ८ ग्रॅम | उगवणपश्चात पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी. | प्रसारक द्राव्य १ मिलि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रुंद पानांच्या (बथुवा, रानमेथी, रानमटर, कृष्णनील, चांदवेल) तण व्यवस्थापनासाठी. |
| क्लोडीनाफॉप- प्रोपार्जील (१५ टक्के डी.एफ.) १६० ग्रॅम | उगवणपश्चात पेरणीनंतर | २५ ते ३० दिवसांनी. गवतवर्गीय तणांच्या व्यवस्थापनासाठी. |
| फेनोक्साप्रॉप-पी-इथील (१० टक्के ई.सी.) ४०० ते ४८० मि.लि. | उगवणपश्चात पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी. | गवतवर्गीय तणांच्या व्यवस्थापनासाठी. |
| क्लोडीनाफॉप- प्रोपार्जील (१५ टक्के) अधिक मेटसल्फुरॉन मिथील (१ टक्का डी.एफ.) (संयुक्त) १६० ग्रॅम | उगवणपश्चात पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी. | रुंद आणि गवतवर्गीय तणांच्या व्यवस्थापनासाठी. |

### तणनाशक फवारणीवेळी घ्यावयाची काळजी

तणनाशकाची शिफारशीत मात्रेत व वेळेनुसार फवारणी करावी. उगवणपूर्व तणनाशक चांगली मशागत केलेल्या ढेकळेरहित व सपाट जमिनीवर पुरेसा ओलावा असताना फवारावे. फवारणीसाठी स्वच्छ पाणी वापरावे. रासायनिक तणनाशकाच्या फवारणीसाठी प्रति एकर १५० ते २०० लिटर पाणी वापरावे. सतत एकाच तणनाशकाचा वापर टाळावा. तणनाशक फवारणीसाठी वेगळ्या पंपाचा वापर करावा. तणनाशक फवारणीसाठी फ्लॅट फॅन किंवा फ्लड जेट नोझल वापरावे. २,४-डी सारख्या तणनाशकाचा वापर हवा शांत असताना करावा. गहू पिकात फवारणी ३० ते ४० दिवसांच्या दरम्यान करावी. त्या अगोदर किंवा उशिरा फवारणी केल्यास गव्हाच्या ओंब्या वाकड्या निघून उत्पादनात घट येते. गहू पिकानंतर ज्वारी, मका किंवा चवळी या पिकाची लागवड करायचे नियोजित असल्यास तणनाशकांमध्ये सल्फोसल्फुरॉन या घटकाचा समावेश असलेल्या तणनाशकाचा वापर टाळावा. २,४-डी किंवा सल्फोसल्फुरॉन तणनाशकाचा वापर हवा शांत असताना करावा. अन्यथा, शेतालगतच्या रुंद पानी मोहरी वा हरभरा पिकांचे नुकसान संभवते. तणनाशकावरील लेबलवरील माहिती नीट वाचून घ्यावी. तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.

पारनेर दर्शन

# महिने ६, रूग्ण २६, मदत ६१ लाख!

**| पंतप्रधान फंडातून खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून मोठी मदत**
**| राज्यापाठोपाठ केंद्रातही खा. लंकेंची दमदार कामगिरी**

**पारनेर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून राज्यातील २८८ आमदारांमध्ये सर्वाधिक मदत मिळवून देण्याचा बहुमान प्राप्त केलेल्या खासदार नीलेश लंके यांनी संसदेत जाऊन सहा महिन्यातच राज्याप्रमाणेच दमदार कामगिरी केली आहे. ६ महिन्यात २६ रूग्णांना त्यांनी ६१ लाख २२ हजार ५०० रूपयांची मदत विविध रूग्णांना खा. नीलेश लंके यांच्या शिफारशीवरून प्रंतप्रधान सहाय्यता निधीतून करण्यात आली आहे.**

विविध आजारांमुळे त्रस्त असलेल्या रूग्णांना मदत करण्याचा पिंड खा. नीलेश लंके यांचा आहे. त्यांचे नीलेश लंके प्रतिष्ठान किंवा विविध धर्मदाय रूग्णालयांमधून ते गरजू रूग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात गेल्या अनेक वर्षांपासून उपचार मिळवून देत आहेत. विधानसभेत गेल्यानंतर त्यांनी विशेषतः मुख्यमंत्री सहायता निधीचा मोठया खुबिने वापर करून घेत राज्यात सर्वाधिक रूग्णांना या फंडातून मदत मिळवून दिली. या कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनीच त्याची माहीती अधिकृतपणे यापूवच जाहिर केलेली आहे.



### कोरोना संकटातील रूग्णसेवेचा अनुभव

कोरोना महामारीमध्ये जगामध्ये हाहाकार माजल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत दोन्ही लाटांमध्ये मोठया धाडसाने कोरोना बाधितांना मदतीचा हात दिला. घाबरलेल्या रूग्णांना आधार देत दिलासा दिला. कोरोनाच्या दोन्ही लाटांमधील केलेल्या रूग्णसेवेचा, रूग्णांना होणाऱ्या यातनांचा तसेच त्यांना आधार दिल्यानंतर त्यांच्या वाढलेल्या आत्मविश्वासाचा अनुभव लंके यांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे कोरोना संकटानंतर आरोग्यासाठीच्या मदतीसाठी खा. लंके हे अधिक सजग झाले आहेत.

### स्वतंत्र कक्ष

उपचारासाठी मतदारसंघातीलच नव्हे तर राज्याच्या कोणत्याही भागातील रूग्ण किंवा त्याचा नातेवाईक आल्यास त्यांना मदत करण्याची खा. लंके यांची भुमिका असते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यालयात वैद्यकिय कक्षाची स्थापना केली असून सबंधित रूग्णाचा प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्याचे काम हा कक्ष करतो. राज्यपातळीवरील काही तज्ञही या कक्षाला मदत करतात.

### आरोग्य शिबिराचे आयोजन

मतदारसंघात लवकरच आरोग्य शिबिर तसेच नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्याची घोषणा खा. नीलेश लंके यांनी नुकतीच केली आहे. या शिबिरात रूग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. नेत्र तपासणीच्या माध्यमातूनही डोळयांसदर्भातील तक्रारी दुर करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# मतमोजणीचा घोळ संपता संपेना!

**३१ जिल्ह्यांतील ९५ जागांवर फेरतपासणीसाठी १०४ अर्ज**

**नागपूर : प्रतिनिधी**



**राज्यातील ३१ जिल्ह्यातील एकूण ९५ विधानसभा मतदारसंघात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात एकूण १०४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. या १०४ अर्जांमधून महाराष्ट्र राज्यातील १,००,४८६ मतदानकेंद्रापैकी ७५५ मतदान केंद्रावरील ईव्हीएम संचाची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

एका मतदान केंद्रासाठी ४० हजार रूपये शुल्क व त्यावर १८ टक्के जीएसटी मिळून ४७,२०० रूपये होतात. या हिशेबाने ७५५ मतदान केंद्रांचे ३ कोटी ५६ लाख ३६ हजार रूपये जमा करण्यात आले आहे. राज्यातील उर्वरित सिंधुदुर्ग, नंदुरबार, अमरावती, वर्धा व गडचिरोली या ५ जिल्ह्यात ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भातील अर्ज प्राप्त झाले नाही असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ जून २०२४, १६ जुलै व ३० जुलै २०२४ रोजीच्या पत्रान्वये ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना दिलेल्या आहेत. ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीदरम्यान निवडणूक याचिका दाखल नसलेल्या प्रकरणी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी पार पडलेली प्रक्रिया पुन:श्च पार पाडली जाते. त्यानुसार,ईव्हीएम-व्हीव्हीपॅटच्या संचातील प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचा डेटा क्लियर करण्यात येवून अभिरूप मतदान (मॉकपोल) घेण्यात येते. अंतिमत: सीयु मधील डेटा व व्हीव्हीपॅट मशिन्स मधील स्लिप्स यांच्या आकडेवारीमध्ये तफावतीबाबत निरीक्षण करण्यात येऊन संबंधित संचातील ईव्हीएमचे कामकाज व्यवस्थित असल्याची खात्री करण्यात येते.

३० जुलै रोजीच्या पत्रान्वये ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशिन्सच्या बर्न्ट मेमरी आणि मायक्रोकंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसंदर्भात उत्पादक कंपनीकडून तपासणीच्या तारखेआधी ३ दिवसपर्यंत अर्जदार त्यांचा तपासणीचा अर्ज कोणत्याही वेळी मागे घेऊ शकतो. त्यानुसार संबंधित अर्जदारास त्याने जमा केलेले शुल्क त्यांना परत करण्याची तरतूद आहे, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# मनोज जरांगे मराठा आरक्षणासाठी पुन्हा मैदानात

**| फडणवीस सरकारला ५ जानेवारीपर्यंतचा अल्टीमेटम**
**| मस्ती अन् गुर्मीत राहू नका असा इशारा**

**जालना : प्रतिनिधी**



**महायुतीचे ५ डिसेंबर रोजी सरकार स्थापन झाले आहे. त्यांना आम्ही १ महिन्यांचा कालावधी देत आहोत, त्यांनी ५ जानेवारीपर्यत मराठा आरक्षण, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अन्यथा मराठा समाज पुन्हा संपूर्ण ताकदीने सरकारला परेशान करतील, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.**

मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, वैचारिक मतभेद जरी असले तरी अभिनंदन करण्याची, शुभेच्छा देण्याची प्रथाच आहे. त्याप्रमाणे त्या तिघांचं खूप-खूप अभिनंदन. पण आता मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी सुरुवात करायची. नाटकबाजी बंद करायची असेही त्यांनी म्हटले आहे.

सरकार स्थापन झाले आहे, जनतेचे प्रश्न मार्गी काढणे गरजेचे असल्याचे सांगत श्री.जरांगे पाटील म्हणाले की, समाजात जी खदखद आहे, ती त्यांना दिसत नसेल पण इतकी भयंकर सुप्त लाट आहे, ते परेशान होतील. काल सरकार स्थापन झाल्यावर त्यांना तिघांना आम्ही शुभेच्छा दिल्या आहेत. आता त्यांनी गोरगरिबांचे प्रश्न मार्गी लावले पाहिजे. ५ जानेवारीपर्यत त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा. नसता हे मराठे तुफान ताकदीने आंदोलनात उभे राहून सरकारला परेशान करणार आहेत, सोडणार नाही.२००४ चा अध्यादेशामध्ये दुरुस्ती करायची, सगे-सोयरेची अंमलबजावणी करायची यासोबतच तिन्ही गॅझेट आणि लाखो पोरांवर झालेल्या केसेस मागे घ्याव्यात.

### सरकारने मागण्या मार्गी काढाव्या

**आमच्या ज्या ८- ९ मागण्या पूर्वीच्या सरकारकडे आम्ही मागितल्या होत्या त्या यांनी मार्गी काढाव्या, तेव्हाही हेच सरकार होते. नसता पुन्हा मराठा समाजाच्या पुढे त्यांना जायचे आहे. गुर्मी, झाकी, अन् मस्तीत सरकारने जगू नये.**

**मनोज जरांगे पाटील**
मराठा आंदोलनकर्ते

# काँग्रेस खासदाराच्या जागेवर सापडले नोटांचे बंडल!

**राज्यसभेत सभापतींचे चौकशीचे आदेश**



**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज पुन्हा गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी संसदेत 'काँग्रेस का हाथ सोरस के साथ' घोषणा दिल्याचा विरोधी पक्षांच्या खासदारांनी तीव्र निषेध नोंदवला. यानंतर लोकसभेचे सत्र दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. मात्र यापूर्वी राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या जागेवरून नोटांची बंडल सापडल्याची माहिती राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी दिली. या प्रकरणावरून देखील सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडल्याचे पाहायला मिळाले.**

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी काल नियमीत तपासणीदरम्यान सभागृहात चलमी नोटा सापडल्याचा आरोप केला . सुरक्षा अधिकार्यांना राज्यसभा सभागृहातील आसन क्रमांक २२२ वर नोटांचे बंडल सापडले असल्याचे धनखड यांनी सांगितले. चलनी नोटा सापडलेली ही जागा सध्या काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांना नेमून देण्यात आलेली आहे. दरम्यान या प्रकरणाची सध्या चौकशी सुरू असल्याचेही धनखड यांनी सांगितले.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड म्हणाले की, ''मी सदस्यांना सूचित करत आहे की, काल सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी सुरू होती. सध्या अभिषेक मनू सिंघवी यांना देण्यात आलेल्या जागेवर चलनी नोटांचा गठ्ठा सुरक्षा अधिकार्यांनी जप्त केला आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात आल्यानंतर मी चौकशीचे आदेश दिले आहेत आणि सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे''.

अभिषेक मनु सिंघवी काय म्हणाले?

दरम्यान या संपूर्ण घटनेवर अभिषेक मनु सिंघवी यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. ''मी राज्यसभेत जाताना फक्त ५०० ची एक नोट बरोबर ठेवतो. मी या प्रकरणाबद्दल पहिल्यांदाच ऐकतोय. काल मी बरोबर १२ वाजून ५७ मिनिटांनी सभागृहात आलो. सभागृहाचे कामकाज १ वाजता तहकूब झाले. त्यानंतर मी कॅन्टीनमध्ये १ वाजून ३० मिनिटांपर्यंत अयोध्या प्रसाद यांच्याबरोबर बसून होतो आणि नंतर निघून गेलो''.

दरम्यान भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी ही घटना अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे. त्यांनी हा सभागृहाच्या प्रतिष्ठेवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. सभागृहाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी यादरम्यान सिंघवी यांचे नाव देखील घेतले.

जेपी नड्डा यांनीकाँग्रेसखासदार अभिषेक मनु सिंघवी यांचे नाव घेतल्यानंतर काँग्रसचे खासदारमल्लिकार्जुन खरगेयांनी त्यावर आक्षेप घेतला. खरगे म्हणाले की, ''मी विनंती करतो की जोपर्यंत या घटनेचा तपास पूर्ण होत नाही आणि याची सत्यता तपासली जात नाही तोपर्यंत कोणत्याही सदस्याचे नाव घेतले जाऊ नये''. जगदीप धनखड यांच्या नोटांचे बंडल सापडल्याच्या खुलाशानंतर सभागृहात जोरदार गोंधळ झाला. या मुद्द्यावरून विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये जोरदार वाद पेटला. काही सदस्यांनी या घटनेच्या चौकशीची मागणी केली तर काहींनी हे एक राजकीय षडयंत्र असल्याचे म्हटले.

# ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन

**वयाच्या ८४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास**
**ब्रेन स्ट्रोक आजाराशी देत होते झुंज**



**अकोले : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ नेते,माजी आदिवासी विकास मंत्री मधुकर पिचड यांचे निधन झाले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. ब्रेन स्ट्रोक आल्याने दोन महिन्यांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. पिचड यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली होती. पिचडांचे कार्यकर्ते हॉस्पिटलच्या बाहेर जमण्यास सुरुवात झालीय.**

मधुकर पिचड यांच्या निधनाच्या वृत्ताला वैभव पिचड यांनी दुजोरा दिलाय. मधुकर पिचड यांचे साडेसहा वाजता नाशिक येथे निधन झाले. त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम त्यांच्या मूळ गावी राजुर येथे दुपारी चार वाजता होणार आहे. अकोले कॉलेज आणि पक्ष कार्यालयात त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी ठेवले जाईल. सकाळी दहा वाजता मुळगाव देवठाण येथे जाणार आहे. मधुकरराव पिचड महाविद्यालयात नागरिकांना अंतदर्शनासाठी पिचड यांचे पार्थिव ठेवले जाईल. मग दुपारनंतर अंत्यविधीची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती वैभव पिचड यांनी दिली.

# शिरूरच्या भूमिपुत्राचा बालस्नेही पुरस्काराने गौरव!

**पोलिस उपनिरीक्षक शरद नाणेकरांवर शासनाची कौतुकाची थाप | लहान मुलांची चोरी करणारी टोळी केली होती जेरबंद**

**शिरूर : प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील मोराची चिंचोली गावचे सुपुत्र व सध्या मुंबई पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असणारे शरद बाजीराव नाणेकर यांना राज्य सरकारच्यावतीने बालस्नेही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**

शिरूर तालुक्यातील मोराची चिंचोली या गावातील शेतकरी कुटुंबातून शरद नाणेकर महाविद्यालयीन शिक्षणानंतर थेट मुंबई पोलीस दलामध्ये भरती झाले. त्यांनी व्हीआयपी सुरक्षा त्याचबरोबर दहशतवादी विरोधी पथकात काम केले. एटीएस मध्ये असताना नाणेकर यांनी अत्यंत चमकदार कामगिरी केली. त्याबद्दलही त्यांच्या पाठीवर वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळाली.

गरीब, गरजू गर्भवती महिलांची बेकायदा नर्सिंग होममध्ये प्रसूती करून नवजात बाळांची विक्री करणारी एक टोळी गेल्यावर्षी ट्रॉम्बे पोलिसांनी उघडकीस आणली होती. याप्रकरणी बोगस महिला डॉक्टर, तीन दलाल महिला, टोळीची मास्टरमाइंड असलेली 'एनजीओ'चालक आणि एका मातेसह सहा जणींना अटक करण्यात आली होती. पोलिसांनी त्यांच्याकडून पाच आणि ४५ दिवसांच्या दोन बालकांची सुटकाही केली होती, वरीष्ठांच्या



मार्गदर्शनाखाली शरद नाणेकर यांनी एक बोगस ग्राहक बनवून या टोळीला जाळ्यात ओढण्यासाठी सापळा रचला आणि त्यात ते यशस्वी ठरले. या कामाची दखल घेऊन राज्य सरकारने त्यांना बालस्नेही पुरस्काराने गौरविले. यापूर्वीही त्यांना बेस्ट डिटेक्शन मेडल देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

याशिवाय अनेक क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करून त्यांनी आपली कर्तव्यनिष्ठता आणि कार्यतत्परता सिद्ध केली आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने संपूर्ण शिरुर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### बालस्नेही पुरस्कार कोणाला मिळतो...

राज्य बाल हक्क संरक्षण आयोग हा राज्यस्तरीय बाल हक्क संरक्षण अधिनियमान्वये स्थापित आयोग आहे. बाल हक्काच्या संरक्षणाची जपणूक, प्रचार व प्रसार हा आयोगाचा उद्देश आहे. राज्यात बालकांचा सर्वांगीण विकास, बाल हक्क संरक्षण, त्यांची सुरक्षा, आरोग्य अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल संरक्षण कक्ष, विशेष बाल पोलिस पथकातील अधिकारी व कर्मचारी, बालगृह, बालकल्याण समिती या प्रशासकीय यंत्रणा व संस्था या सकारात्मक पद्धतीने मोलाचे कार्य पार पाडत आहेत, अशा व्यक्ती व संस्थांना बालस्नेही पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

(पान १ वरून)

## भाजपात मंत्रिपदांसाठी भलीमोठी यादी!

प्रदेशाध्यक्षपद, विधानसभा अध्यक्ष होण्यास कोणीही तयार होत नाही. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपदाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. याच बावनकुळेंचं तिकीट गेल्या विधानसभा निवडणुकीवेळी पक्षानं कापलं होतं. त्यानंतर पक्षानं त्यांना प्रदेशाध्यक्षपद दिलं. याच बावनकुळेंच्या नेतृत्त्वात भाजपनं अभूतपूर्व यश मिळवलं. फडणवीस २०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असताना बावनकुळेंकडे ऊर्जामंत्रिपद होतं. त्यामुळे त्यांच्याकडे मंत्रिपदाचा अनुभव आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत बावनकुळेच प्रदेशाध्यक्षपदी राहतील, अशी शक्यता आहे. त्यानंतर ते मंत्रिमंडळात सहभागी होतील. त्यांच्या जागी विधानपरिषदेचे आमदार राम शिंदे किंवा आमदार आशिष शेलार यांची वर्णी लागू शकते. फडणवीस सरकारमध्ये त्यांनी शिक्षण मंत्रिपदाची धुरा सांभाळली आहे. पण त्यांना केवळ ५ महिन्यांसाठीच मंत्रिपद मिळालं होतं.विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांचं नाव चर्चेत आहे. त्यामुळे त्यांचा ओम बिर्ला होण्याची शक्यता आहे. संसदेत ओम बिर्ला जून २०१९ पासून लोकसभेचं अध्यक्षपद सांभाळत आहेत. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी बिर्ला यांनाच संधी दिली. आता त्याच प्रकारे नार्वेकर यांना पुन्हा एकदा अध्यक्षपद दिलं जाण्याची शक्यता आहे.



# पारनेरमध्ये महामानवाला अभिवादन

## डॉ. आंबेडकर स्मारकात अभिवादन सभा



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांचे

**आपल्या देशाला आदर्श राज्यघटना देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त बहुजनांचे नाहीत तर सर्वांचे आहेत. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी सर्व समाजाने अभिवादन समयी उपस्थित राहिले पाहीजे असे आवाहन मी करते.**

**आम्रपाली जाधव**
लेखापाल

**पारनेर : प्रतिनिधी**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पारनेर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये महामानवाला अभिवादन करण्यात आले.**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्मारकामध्ये अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राहुलनगर मधील उपासकांनी सामुदायिक बौध्द वंदना ग्रहण केली. लोकशाही व संविधान बचाव अभियानाचे मुख्य प्रवर्तक राजेंद्र करंदीकर यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर याच्या प्रतिकृतीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. पारनेर पोलीस प्रशासन, सुनिटी ऑफ मुलनिवासी समाज तथा विश्वबंधुत्व फाउंडेशन, पारनेर तालुका बौध्द हितवर्धक संघ, राहुलनगर मित्र मंडख, पारनेर नगरपंचायत, धम्मपद मॉनेस्ट्री, भारतीय जनता पार्टी तसेच शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी स्मारकास भेट देऊन अभिवादन केले.

यावेळी पोलीस निरीक्षक समीर बारवकर, उपनिरीक्षक नितीन खंडागळे, मार्तंडराव बुचूडे, संतोष सोबले, भगवान गायकवाड, किरण भापकर, सुलतान सय्यद, नगरपंचायतच्या लेखापाल आम्रपाली जाधव, नगरसेविका हिमानी नगरे, कल्पना शिंदे, क्रांती वाघमुळे, सोनाली खामकर, सायली ढोमे, माधव गाजरे, छबन औटी, राजेंद्र पठारे, दिनकर रणदिवे, चंद्रकांत गायकवाड, भरत नगरे, रा. या. औटी, शरद नगरे, बाळासाहेब नगरे, बाळासाहेब शेटे, सचिन नगरे, राजेश चेडे, संपत नगरे, गौतम शिंदे, ॲड. बाळासाहेब सोनवणे, उत्तम नगरे, आर आर पवार, बाळासाहेब कांबळे, सतीश जाधव,अनिल सातपुते, राजू उघडे, संपत पवार, सुधीर सोनवणे, जयवंत सोनवणे, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, अशोक चेडे, सतीश म्हस्के, युवराज पठारे, प्रदिप नगरे, संगम सोनवणे, किरण कोकाटे, शुभम कुलट, चंद्रकांत औटी, बंटी श्रीमंदीलकर, जीवन घंगाळे, सुधीर नगरे आदी यावेळी उपस्थित होते.

# पारनेरात शनिवारी भाकरी-आमटीचा बेत!

## खंडोबा मंदिरातील पंचाषष्ठी उत्सवाचे निमित्त | संतोष गाढवे यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यालगतच्या जुन्नर तालुक्यातील आणे व परिसरात प्रसिध्द असलेल्या भाकरी आमटीचा शनिवारी पारनेर शहरात बेत आहे ! शनिवारी साजऱ्या होणाऱ्या चंपाषष्ठी उत्सवाचे औचित्य साधून या बेताचे आयोजन करण्यात आले आहे.**




■ पारनेर पोलीस ठाण्यालगतच्या पावन खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पारनेर शहरातील पोलीस ठाण्यालगत असलेल्या प्रसिध्द खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवानिमित्त प्रसिध्द आमटी भाकरीचा महाप्रसाद देण्यात येणार असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष संतोष गाढवे यांनी सांगितले. पारनेर पोलीस ठाण्याजवळील प्रसिध्द पावन खंडोबा मंदिरात दरवर्षी चंपाषष्ठी उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात येतो. यंदाही शनिवार दि.७ डिसेंबर रोजी या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून त्याचे नियोजन पुर्ण झाले असल्याचे गाढवे म्हणाले.

उत्सवामध्ये सकाळी दहा ते बारा जागरण गोंधळ, सायंकाळी सहा ते आठ हभप ज्ञानेश्वर महाराज तांबे यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले असून किर्तनानंतर आमटी भाकरीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात सहभागी होणाऱ्या भाविकांनी आपल्या घरून प्रत्येकी पाच ते दहा भाकरी घेऊन येण्याचे आवाहन देवस्थान कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

चंपाषष्ठी उत्सवात भाविकांनी सहभागी होऊन आमटी भाकरीच्या महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन रमेश औटी, विशाल शिंदे, सतिश औटी, कल्याण थोरात, प्रमोद गोळे, सतिश म्हस्के, हर्षवर्धन औटी, समिर शेख, उदय शेरकर यांच्यासह देवस्थान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### काय आहे अख्यायिका?

**खंडोबाचे नवरात्र मार्गशीर्ष शुध्द प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुध्द षष्ठी असे सहा दिवस साजरे केले जाते. मार्गशीर्ष शुध्द षष्ठी म्हणजेच चंपा षष्ठी. या दिवशी ऋषींच्या विनंतीला मान देऊन खंडोबा हे मणी-मल्लचा वध करून लिंगव्दय रूपाने प्रकट झाले. नवरात्राचे पाच दिवस उपवास करून तो सहाव्या दिवशी म्हणजेच चंपाषष्ठीला सोडला जातो.**

# बारकूशेठ भाईक यांचे निधन

## काटाळवेढयाचे जुने कारभारी हरपले

**काटाळवेढा : प्रतिनिधी**



**पारनेर तालुक्यातील काटाळवेढे गावचे माजी सरपंच व गावचे ज्येष्ठ कारभारी बारकूशेठ जनाजी भाईक यांचे नुकतेच ८१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.**

काटाळवेढे गाव व परिसरातील विकासासाठी त्यांचे फार मोठे योगदान होते. एक जुने कारभारी म्हणून गाव व परिसरातील विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे बारकूशेठ भाईक यांचा तालुक्यात लौकिक होता. अतिशय संमजस व प्रेमळ व्यक्तिमत्व म्हणून ते जनतेत परिचीत होते. त्यांच्या पश्चात मुले,मुली,सुना,जावई, नातू असा मोठा परिवार आहे.

जिल्हा परिषद शाळेचे निघोज परिसरातील शिवडी येथील शाळेचे मुख्याध्यापक बाजीराव भाईक, एल आय सी विभागाचे पुणे येथील वरिष्ठ अधिकारी व डेव्हलपमेंट ऑफिसर संजय भाईक, प्रगतीशील शेतकरी संपत भाईक यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्यविधीसाठी विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# डॉ. आंबेडकरांची राज्यघटना राष्ट्रनिर्मितीचा मुळ मंत्र

## विश्वनाथ कोरडे यांचे प्रतिपादन | भाजपाच्या वतीने पारनेरात महामानवाला अभिवादन



**पारनेर : प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजामध्ये समता, स्वातंत्र्य, आणि बंधुत्वाची तत्वे प्रस्थापित केली आणि प्रत्येक भारतीयाच्या स्वप्नांना हक्क आणि संधींमध्ये रूपांतरित करण्याचा मार्ग दाखविला. त्यांनी देशाला दिलेली राज्यघटना केवळ दस्तऐवज नसून राष्ट्र निर्मितीचा मुळ मंत्र असल्याचे प्रतिपादन भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केले.**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पारनेर भाजपाच्या वतीने बसस्थानकासमोरील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी बोलताना कोरडे पुढे म्हणाले, दैनंदिन जीवन जगत असताना बाबासाहेबांचा आदर्श आणि तत्वांचे पालन करणे हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल. सर्वांनी त्या दृष्टीने वाटचाल करणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकर यांनी घालून दिलेल्या आदर्श व तत्वांना उजाळा देत यावेळी बोलताना कोरडे म्हणाले, समाजसुधारक, अर्थतज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर ६ डिसेंबर हा दिवस भारतामध्ये महापरिनिर्वाण दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महापरिनिर्वाण दिनानिमित्त १ डिसेंबरपासून लाखो अनुयायांची मुंबईतील त्यांचे समाधीस्थळ असलेल्या चैत्यभूमी परिसरात दाखल झाले असून आज लाखो अनुयायी हे चैत्यभूमी स्तूपात ठेवलेल्या डॉ. आंबेडकर यांचा अस्थीकलश व प्रतिमेस अभिवादन करत दर्शन घेतील असे ते म्हणाले.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, नगरसेवक युवराज पठारे, अशोक चेडे, प्रदीप नगरे, किरण कोकाटे, संतोष शेलार, सतीश म्हस्के, अरूण खामकर, स्वप्निल औटी, वैभव श्रीमंदीलकर, प्रदीप आढाव, शुभम कुलट यांच्यासह इतर युवक सहकारी उपस्थित होते.

# निघोज जि.प.शाळेत विविध गुणदर्शन स्पर्धा

## कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

**निघोज : प्रतिनिधी**



**जि.प प्राथ. केंद्रशाळा निघोज येथे केंद्रपातळीवरील विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.निघोज केंद्रतील सर्व शाळांनी सहभाग घेतला.**

जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा अतिशय चांगला असून निघोज मधील सर्व शाळांच्या ज्या भौतिक गरजा असतील त्या ग्रामपंचायत मार्फत पुर्ण केल्या जातील असे आश्वासन सचिन पाटील वराळ यांनी दिले. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी श्रीमती राणे यांनी विदयार्थी व शिक्षिक यांना मार्गदर्शन केले. विस्तार अधिकारी श्री.पिंपरकर ,केंद्र प्रमुख बाचकर, मुख्याध्यापक कैलास शिंदे, ज्येष्ठ शिक्षक सुभाष महाराज मगर, काळे सर, काळोखे सर, दिघे मॅडम, सालके मॅडम गावातील विविध मान्यवर, महिला भगिनी, ग्रामस्थ, उपस्थित होते.

सर्व शाळांचे विद्यार्थी, सर्व शिक्षक उपस्थित होते. स्पर्धा दिवसभर घेण्यात आल्या.विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम कार्यक्रम सादर केले. मुलांची तयारी चांगली होती. स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आलेल्या मुलांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहन उनवणे, ग्रामपंचायत सदस्या भावना साळवे, ग्रामपंचायत सदस्य अस्लमभाई इनामदार यांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. याप्रसंगी स्वरांजली केक्स या गृहउद्योग समूहाच्या अध्यक्षा सरला उनवणे, मगर मॅडम, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांना तालुका स्तरावरील स्पर्धे साठी पाठविण्यात येणार आहे. स्पर्धा पार पाडण्यासाठी निघोज केंद्रातील व शाळेतील सर्व शिक्षकांनी अतिशय उत्तम नियोजन केले होते.

# मळगंगेला नैवेद्य, लाडू वाटप आणि आतिषबाजी!

## फडणवीस सरकारच्या शपथविधीनंतर निघोजमध्ये जल्लोष



### महायुतीने लोकाभिमुख योजना राबविल्या

**महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात लोकाभिमुख योजना राबविल्या. शेतकऱ्यांना मोफत वीज, लाडकी बहिण योजना आदी योजना राबवून सर्वसामान्यांना न्याय दिला. त्यामुळेच विक्रमी जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले.**

**चित्राताई वराळ**
सरपंच, निघोज

**निघोज : प्रतिनिधी**

**गुरूवारी मुंबईमध्ये देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा शपथविधी पार पडला आणि निघोजमध्ये एकच जल्लोष करण्यात आला. मळगंगा मातेला नारळ वाढवून नैवैद्य दाखवून, लाडूंचे वाटप व फटाक्यांची आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.**

शपथविधी पार पडल्यानंतर महायुती समर्थकांनी मळगंगा मातेला पुष्पहार अर्पण करीत महायुती सरकारच्या माध्यमातून राज्यात जन विकासाची चांगली कामे होवोत असे साकडे घातले. भाजपाच्या सांस्कृतीक सेलचे तालुकाध्यक्ष विलास हारदे यांनी लाडूचे वितरण केले. हारदे यांच्या पत्नी चित्राताई व भावजय सुंदरताई यांनी महिन्याभरापूर्वी पारनेरमध्ये महायुतीचा उमेदवार विजयी होऊन राज्यात महायुतीची सत्ता यावी यासाठी मळगंगा देवीला नवस केला होता. त्याची पुर्ती हारदे परिवाराकडून करण्यात आली.

यावेळी सरपंच चित्रा वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वराळ, बाळासाहेब जगताप, अनिल शेटे, राजू लाळगे, डॉ. निवृत्ती पानमंद, विलास हारदे, मनोहर राऊत, मोहन खराडे, अस्लम इनामदार, योगेश खाडे, सचिन जाधव, जयसिंह हरेल, मंगेश भागवत, सुनील गायखे, चैतन्य खराडे, नीलेश जंगम, आर्यन गायखे, कविता बोरूडे, सोनीताई पवार, बाबी गायखे, पारूबाई गायखे, आराध्या गायखे आदी उपस्थित होते.

### सर्वसामान्यांना न्याय मिळेल

**चाळीस वर्षांचा राजकीय अनुभव असलेल्या काशिनाथ दाते यांना विधानसभेत पाठवून मतदारांनी विरोधकांना जागा दाखवून दिली. महायुती सरकारच्या माध्यमातून काशिनाथ दाते हे सर्वसामान्य जनतेच्या समस्या दुर करतील याची खात्री आहे.**

**ज्ञानेश्वर वरखडे**
उपसरपंच, निघोज

# पिंपरी जलसेनकरांना कुणी वीज देता का, वीज?

## नव्याने दिलेली रोहित्रे असून अडचण, नसून खोळंबा!

**पिंपरी जलसेन : प्रतिनिधी**

**पिंपरी जलसेनची वीजेची समस्या दूर करण्यासाठी महावितरणकडून सहा महिन्यांपूव दोन रोहित्रे देण्यात आली खरी, मात्र त्यांची असून अडचण आणि नसून खोळंबा अशी अवस्था झाल्याने वीज देता का वीज अशी अवस्था पिंपरी जलसेनकरांची झाली आहे.**




पिंपरी जलसेन येथील शेतकऱ्यांचे शेती पंप तसेच घरगुती ग्रहकांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने महावितरणकडून घरगुती वीजेसाठी २ व शेती पंपांसाठी १ असे एकूण तिन रोहित्रे सहा महिन्यांपूर्वी मंजुर करण्यात आली. ठेकेदाराने तिनही रोहीत्रे बसविलीही मात्र तिनही रोहीत्रे न जोडली गेल्याने वीजेची समस्या जैस थे आहे.

पिंपरी जलसेनमधील अडसरे मळा व काळे मळा येथे घरगुती ग्राहकांसाठी तर थोरात दरा येथे शेती पंपांसाठी स्वतंत्र रोहित्र बसविण्यात आले आहे. रोहित्रे बसविल्यानंतर त्यांना वीजेची जोडणी देऊन इतर रोहित्राचा भार कमी करून सर्व रोहीत्रांचा भार समान करण्याचे काम प्रलंबित असल्याने आजूनही ग्राहकांना कमी दाबाने वीज पुरवठा होतो आहे. हे काम पुर्ण करण्याबाबात महावितरणच्या अधिकाऱ्यांमध्ये उदासिनता दिसून येत आहे.

रोहित्रासाठी निधी मंजुर करून त्याची उभारणीही करण्यात आली. मात्र पुढचे कामच न झाल्याने वीजेचे समस्या कायम राहिल्याने या रोहित्रांचा लाभ नेमका ठेकेदाराला झाला की ग्राहकांना असा सवाल ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नी योग्य ती कार्यवाही करून तिनही रोहित्रे जोडून द्यावीत, रोहित्रांवरील भाराचे नियमन करून नागरीकांच्या घरगुती व शेती पंपांच्या वीजेचा प्रश्न मार्गी लावावा अश मागणी पिंपरी जलसेनकर करत आहेत.

### शेतीपंपासाठी स्वतंत्र फिडर हवे

**पिंपरी जलसेन, चिंचोली, गडदवाडी, गांजीभोयरे या गावांसाठी वडझिरे उप केंद्रामधून वीज पुरवठा करण्यात येतो. या फिडरवर वडझिरे परिसरातील सर्व शेतीपंपांचा भार असल्याने या गावांना पुर्ण दाबाने वीज पुरवठा होत नाही. या गावांसाठी वडझिरे उप केंद्रातून वेगळया फिडरमधून वीज पुरवठा करण्यात आला तर या गावांच्या वीजेची समस्या कायमची दुर होणार आहे. त्यासंदर्भात नागरीक सामुहिकपणे निवेदन सादर करणार आहेत.**

### अधिकारी, लोकप्रतिनिधींना भेटणार

**पिंपरी जलसेनमधील शेती पंप आणि घरगुती वीजेचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. त्यासंदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांचे वेळोवेळी लक्ष वेधले आहे. मात्र त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. आता महावितरणचे वरीष्ठ अधिकारी तसेच नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेऊन या प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.**

**चंद्रकांत कदम**
सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार

### घरगुती दिवेही लागेनात !

**घरगुती ग्राहकांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने सायंकाळी घरातील दिवेही लागत नाहीत. नागरीकांना मेणबत्ती अथवा कंदील अशा साधनांचा वापर करून रात्र काढावी लागते. जनावरांसाठी चारा कुट्टी करणारी यंत्रे, घरातील पीठच्या गिरण्याही कमी दाबाच्या वीज पुरवठयामुळे चालत नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थ वीजेच्या या खेळखंडोबामुळे त्रास्त आहेत. महावितरणकडून त्यावर उपाय योजना करण्याची मागणी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com